UGC CARE Listed Journal
ISSN 2231 - 573X

वर्ष १० वे
अंक - ४ था (जानेवारी ते मार्च - २०२०)

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

भाग - ३



संपादक
डॉ. शिवाजी हुसे
मराठी विभाग प्रमुख,
शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद.

# भाग - ३


| क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | महात्मा बसवेश्वर : वचन साहत्याची निर्मिती<br>**प्रा. डॉ. ललित अधाने** | १-४ |
| २ | महात्मा बसवेश्वरांच्या विचारांची प्रासंगिकता<br>**प्रा. गादगे एल. एस.** | ५-१४ |
| ३ | नाथ संप्रदायाची परंपरा : आणि अभ्यास क्षेत्रे<br>**प्रोफसर डॉ. रामनाथ गंगाधर वाढे** | १५-१७ |
| ४ | पंडिती साहित्याचे अध्ययन अध्यापन आणि संशोधन<br>**प्रा. डॉ. मीनाक्षी देव** | १८-२५ |
| | पंडिती काव्य अध्ययन, अध्यापन<br>**प्रा. चारूशिला राजेश्वर रूमाले** | २६-३६ |
| | बखर वाङ्मय : एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. अशोक गणपतराव पाठक**<br>**प्रा. रामेश्वर शिवाजीराव वायाळ** | ३७-४० |
| | मराठी वाङ्मयात शाहिरी काव्य परंपरा<br>**प्रा. डॉ. गिऱ्हे डी. पी.** | ४१-४३ |
| | शाहिरी काव्य : मराठी साहित्यातील प्रभातकाळ<br>**प्रा. डॉ. गजानन पां. जाधव** | ४४-४८ |
| | मध्ययुगीन मराठी शाहिरी ते महाराष्ट्रातील पुरोगामी शाहिरी वाङ्मयाचे संशोधन<br>**प्रा. युवराज धबडगे** | ४९-५२ |
| | शाहिरी वाङ्मय : एक मराठी काव्यपरंपरा<br>**डॉ. सुषमा शंकरराव प्रधान** | ५३-५६ |
| | शाहिरी वाडमय : भेदिक कविता<br>**डॉ. सुधाकर जाधव** | ५७-५९ |
| | शाहिरी वाङ्मय : सामाजिक परितर्वनाचे स्वरूप<br>**डॉ. अर्चना काटकर** | ६०-६३ |

# ६. बखर वाङ्मय : एक अभ्यास

**प्रा. डॉ. अशोक गणपतराव पाठक**
मराठी विभाग, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर ता. परतूर जि. जालना.
**प्रा. रामेश्वर शिवाजीराव वायाळ**
इतिहास विभाग, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय,परतूर ता. परतूर जि. जालना.

**प्रास्ताविक**

लीळाचरित्राच्या रुपाने मराठी साहित्यामध्ये सुंदर असे लालित्यपुर्ण गद्य लेखन झालेले दिसते. पुढे संत एकनाथ आणि संत रामदास यांनी खूप चांगल्या पध्दतीने हा प्रवाह चालू ठेवला आहे. पण खरा बहर आला तो शिवकाळात आणि पेशव काळातच. या काळातल्या बखरींनी मराठी सहित्यात मानाचे अनेक तुरे खोवले आहेत.

बखर लेखनामागे खरं तर सत्य कथन ही भूमिका असते, याला खुप मोठा आधार आहे. चरित्र लेखनाचा तो एक मोठा असा पट राहिलेला आहे. सत्य कथन व राजाज्ञा ह्या अशा चरित्र लेखनाच्या प्रेरणा असतात. मराठीतील बखर गद्य म्हणजे इतिहासाचे सुवर्णपान म्हणावे लागते.

**बखर म्हणजे काय?**

'बखर' या शब्दाचे काही अर्थ आपण पाहू या. या शब्दाचे अभ्यासकांनी सांगितलेले अर्थ असे अनेक आहेत. 'बक' म्हणजे बोलणे असा एक अर्थ इतिहासाचार्य राजवाडे यांनी सांगितलेला आहे. काही अभ्यासक असेही म्हणतात की, पूर्वी राजांच्या आज्ञा ह्या बकरीच्या कातड्यावर लिहिल्या जायच्या, त्यावरुन मग त्याला 'बखर' असे नाव पडले असावे, असे म्हणतात. भाषा शास्त्रातील नियमाप्रमाणे 'खबर' या अरबी शब्दावरुन 'बखर' हा शब्द पुढे आल्याचे सांगण्यात येते.

शिवकाळातल्या लढाया, ह्या लढायांमधील झालेले अनेक करार, जाहिरनामे किंवा आज्ञापत्रे ह्यांचा समावेश साधारणत: बखरीत होतो. साहित्यातील जे प्रकार आहेत ते म्हणजे कथा, कविता, कादंबरी, नाटक इ. प्रमाणे बखर ही लालित्यपुर्ण असतेच असे नाही. काही बखरी तशा असतात, पण अपवादात्मकच. कारण 'बखर' हो चरित्र ग्रंथ म्हणूनच लिहिली गेली आणि मुळात तिचे लिखाण हे साहित्य या हेतुने झालेलेच नाही. बखर लिहोणाऱ्याने तिच्यात लालित्य भरलेले असते. आणि हेच तिचे वाङ्मयीन रुप म्हणता येते. बखरकार जेवढा सृजनशील, मनाने लयबध्द तेवढी ती बखर इतिहासातील घटनांच्या अंगाने रंगत जाते आणि वाङ्मयीन मूल्य प्राप्त करुन घेते. बखरीच्या रुपाने आपल्याला इतिहास पुन्हा वाचायला मिळतो. ती वाचतांना आपण त्या जगात जातो, स्वत: बखरकार हा त्या काळातील घटनांचा साक्षीदार असल्याने त्याची निर्मिती सत्याच्या जवळ जाणारी होते. राजाश्रयामुळे बखर निर्मितीला बळ येते. राजाच्या आज्ञेमुळे काही बखरी ह्या